# आदर्श अंगणवाडी एक संकल्पना

**पुर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षण हा पुढील शिक्षणाचा पाया मानला जातो.**

सोलापुर जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामिण भागामध्ये एकंदर २७९७ अंगणवाडया व ५६५ मिनी अंगणवाडया कार्यरत आहेत.

अंगणवाडी मध्ये सर्वसाधारण पणे ०३ ते ०६ वयोगटातील मुलांना पुर्वप्राथमिक शिक्षण.पुरक पोषण आहार ,लसीकरण,आरोग्य तपासणी व गंभिर आजारी असेल तर संदर्भ सेवा दिली जाते.

जिल्हामध्ये ज्यावेळेस मी अंगणवाडयांना भेटी दिल्या त्यावेळेस असे लक्षात आले कि मुलांना गणवेश नाहीत,बसण्यासाठी बस्कर पटया किंवा काहीच नाही,मुलांना दिला जाणारा नाष्टा व गरम आहार हा खाली बसुन खावा लागत होता. ब-याच वेळेस तो आहार खाली साडला जात होता त्यामुळे अंगणवाडीचे चित्र काहीस उस्त्साहवर्धक वाटत नव्हते. यातुन **आदर्श अंगणवाडीची** संकल्पना पुढे आली.

**याबाबत मा.श्री.राजेशकुमार साहेब आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा महाराष्ट्र राज्य यांनी आदर्श अंगणवाडीची रुपरेषा विषद केली.** त्यानुसार सोलापुर जिल्हामध्ये महिला बाल कल्याण विभागाने आदर्श अंगणवाडीची संकल्पना **मा जिल्हा परिषद अध्यक्ष श्री.काका साठे,मा.सभापती महिला व बाल कल्याण.सौ.संगिता सुरेश सरडे ,माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष संजयमामा शिंदे व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी विरेंद्रसिह साहेब यांचे समोर मांडली व त्या सर्वानी तात्काळ होकार दिला**.आदर्श अंगणवाडी मध्ये जे प्रमुख घटक घेतले त्यामध्ये सर्व मुलांना गणवेश (uniform) प्रत्येक मुलांना ओळखपत्र (I card ),प्रत्येक मुलांना अंगणवाडीत बसण्यासाठी बेबी चेअर (खुर्ची ),जेवणसाठी डायनिंग टेबल व डिश,चमचे, अंगणवाडीची रंगरंगोटी ,अंगणवाडी बोलकी करणे (सचित्र) जेणेकरुन मुलांना पुर्व प्राथमिक स्तरापासुनच निट-निटकेपणा,शिक्षणाची आवड,रोजच्या जिवणात घडणा-या व दिसणा-या वस्तु,प्राणी ,रंग,चव,यांचे

ज्ञान व जाणीव होईल.

परंतु यासाठी शासनाचा कसलाही निधी नसल्यामुळे हि संकल्पना लोकसहभागातुन म.बा.क. विभागाने राबविण्याचा निर्णय घेतला. यासाठी तालुकानिहाय अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षिका यांच्या बैठका घेण्यात आल्या. सर्व CDPO ना वेळोवेळी याबाबत सुचना देण्यात आल्या आणि पाहता पाहता जिल्हामध्ये ICDS ची सर्व यंत्रणा कामाला लागली व मागील तीन महिन्यामध्ये एकंदर ११५० अंगणवाडया या आदर्श अंगणवाडया म्हणुन पुर्ण केल्या. यामध्ये प्रामुख्याने बार्शी,दक्षिण सोलापुर,उत्तर सोलापुर,करमाळा या तालुक्याने आघाडी घेतली आहे.इतरही तालूक्यातून याबाबत प्रयत्न चालु आहेत.

यामध्ये ग्रामिण भागातील जनतेने अंगणवाडी सेविका,मदतनिस,पर्यवेक्षिका,सरपंच,जि.प.सदस्य यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग नोंदवला व **जिल्हामध्ये लोकसहभागाच्या माध्यमातुन एकंदर १४३५६८६९ /-रक्कमेएवढे साहित्य रुपाने जमा झाले.** यामुळे अंगावाडीत येणा-या मुलांची उपस्थीती वाढली. मुलांचे पालक अंगणवाडीत येवुन तेथे काय उपक्रम चालु आहेत याची माहिती घेवु लागले व परत आणखीन काही मदत हवी असल्यास विचारणा करु लागले.

**एकंदरीत आदर्श अंगणवाडीची संकल्पना सोलापुर जिल्हयात सर्वाच्या प्रयत्नाने व जनतेच्या सहभागातुन कमालीची यशस्वी झाली असेच म्हणावे लागेल.**

**दत्तात्रय.भ.मुडें**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक)**
**जिल्हा परिषद सोलापूर.**



वळसंग ता. दक्षिण सोलापूर येथील आदर्श आंगणवाडी




मा.सभापती महिला व बाल कल्याण मा.सौ संगीता सरडे या Zee २४ तास ला प्रतिक्रिया देत असताना



आंगणवाडी सेवीका यांचा ता.सांगोला येथील जागृती मेळावा



मा.ना.सुशिलकुमारजी शिंदे केंद्रिय उर्जामंत्री आंगणवाडीसाठी टेबल व खुर्च्या वाटप करताना ता.द.सोलापूर

| |
|---|
|  |
| आदर्श आंगणवाडीत आहार घेत असताना मुले पानगांव ता.बार्शी |
|  |
| आंगणवाडीच्या मुलांचे पुर्व प्राथमिक शिक्षण चालू असताना ता.बार्शी |